तरुण भारत ■ शनिवार, २४ डिसेंबर २०२२

# हळबे महाविद्यालयात दोन दिवसीय चर्चासत्र



दोडामार्ग : मार्गदर्शन करताना शास्त्रज्ञ डॉ. व्ही. जी. मोरे. समीर ठाकुर

वार्ताहर
दोडामार्ग

दोडामार्ग हळबे महाविद्यालयात हवामान बदल आणि भारतीय शेती या विषयावर दोन दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्र झाले. या राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोलीचे कुलगुरू डॉ. संजय सावंत, यांच्या हस्ते करण्यात आले. या चर्चासत्रात रत्नागिरी, कोल्हापूर, औरंगाबाद, गोवा व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्राध्यापक, शेतकरी व विद्यार्थी सहभागी झाले होते. दोन दिवस चाललेल्या चर्चासत्रात अनेक कृषी तज्ज्ञांनी हवामान बदल आणि भारतीय शेती या विषयावर बहुमोल मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय चर्चासत्राचा समारोप २२ डिसेंबर रोजी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोलीचे शास्त्रज्ञ डॉ. व्ही. जी. मोरे, डॉ. एस. आर. तोरणे, डॉ. योगेश परुळेकर तसेच प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांच्या उपस्थितीत झाला. समारोपप्रसंगी बोलताना डॉ. व्ही. जी. मोरे यांनी हवामान बदल आणि भारतीय शेती यासंबंधी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. सुभाष सावंत यांनी सांगितले की, या दोन दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्राचे सर्व सार विद्यार्थ्यांपर्यंत तसेच शेतकऱ्यापर्यंत पोहोचवा. विद्यार्थ्यांनी आपल्या शेतीपासून न पळता कुलगुरूंचा संदेश म्हणजे स्मार्ट शेती केली पाहिजे. तरच पुढील कालावधीत शेती व शेतकरी टिकून राहील. प्रास्ताविक अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. एस. यु. दरेकर यांनी केले. डॉ. संभाजी सावंत यांनीही मनोगत व्यक्त केले. व्याख्याते म्हणून डॉ. योगेश परुळेकर, डॉ. एस. आर. तोरणे, डॉ. व्ही. जी. मोरे, डॉ. ए. पी. चव्हाण, राजेंद्र केरकर व तालुका कृषी अधिकारी प्रमोद बनकर यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन डॉ. पी. डी. गाथाडे यांनी केले, तर आभार डॉ. एस. एन. जाधव यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.